## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ (१) अन्वये झालेली तक्रार

### तक्रार क्रमांक : १२५/२०२२

**तक्रारकर्ता,** श्री.महेंद्र शंकर जाधव,
बॅ.नं.११९६ जवळ, प्रियदर्शनी अपार्टमेंट समोर,
शांतीनगर, उल्हासनगर ३, जि.ठाणे ४२१ ००३.

विरुध्द

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,
ग्रामपंचायत कार्यालय सुकिवली,मु.पो.सुकिवली,
ता.खेड, जि.रत्नागिरी ४१५ ६२१.

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,
ग्रामपंचायत कार्यालय सुकिवली,मु.पो.सुकिवली,
ता.खेड, जि.रत्नागिरी ४१५ ६२१.

**तक्रार सुनावणीचा दिनांक : १४/८/२०२५**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज प्राप्त दिनांक | प्रथम अपिल आदेश प्राप्त दिनांक |
|---|---|---|---|
| २०/८/२०२१ | ---- | २७/१०/२०२१ | २९/११/२०२१ |

तक्रारकर्ता यांनी दि.१८/१/२०२२ रोजीच्या अर्जान्वये " माहिती मिळाली नाही" असे कारण नमूद करुन कलम १८(१) अन्वये तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदर तक्रार अर्जावर आज दिनांक १४/८/२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस उभयपक्ष अनुपस्थित आहेत. (कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत)

तक्रारकर्ता यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्राणे माहिती मागितली आहे.

*" सन १ एप्रिल २०१८ आतापर्यंत या चार आर्थिक वर्षाचे सुकिवली ग्रामपंचायतीच्या वार्षिक अंदाज पत्रकाची छायांकित प्रती मिळण्याबाबत व इतर माहिती"*

तद्नंतर तक्रारकर्ता यांनी प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचेकडे कलम १९ (१) अन्वये प्रथम अपील दाखल केले.

तक्रारकर्ता यांनी दाखल केलेल्या प्रथम अपीलावर तत्कालीन प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी सुनावणी घेऊन दि.२९/११/२०२१ रोजी, "*जन माहिती अधिकारी सुकीवली यांनी अपिलार्थी यांनी दिनांक ०२/०९/२०२१ च्या अर्जातील मागितलेली माहिती ही दिनांक २७/१२/२०२१ पर्यंत विना मोबदला देणेत यावी. तसेच मोठया प्रमाणात असणारी माहिती ही प्रत्यक्ष पहाण्यासाठी अपिलार्थी यांना आठ अगोदर कळवून कार्यालयीन वेळेत पहाण्यासाठी उपलब्ध करून देणेत यावी.*" असा निर्णय दिलेला आहे.

उभयपक्ष सुनावणीस अनुपस्थित आहे. त्यांना सुनावणीची सूचना प्राप्त झाल्याचे पोस्ट ट्रॅकिंग रिपोर्टवरून दिसून येत नाही.

यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. आयोग कार्यालयाने सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी सूचना काढावी.
२. प्रस्तुत प्रकरणाची पुढील सुनावणी दि.२९/९/२०२५ रोजी दुपारी २.०० वाजता होईल.

**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १४ ऑगस्ट, २०२५ .

Comp-३